# सेवक वार्ता

मे -२०२३

वर्ष -४, अंक-७

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६


## सामाजिक वनीकरण विभागातील रोपवाटिकांचे सेवक संघामार्फत मूल्यांकन

दि. ४ मे २०२३ ला झालूल्या समझोता अभिलेख्याच्या अनुषंघाने सामाजिक वनीकरण विभागातील रोपवाटिकांचे सेवक संघामार्फत मुल्यांकन करण्याबाबतचे कार्यारंभ आदेश सेवक संघाला संचालक, वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी चंद्रपूर यांचे मार्फत प्राप्त झाले आहेत. ६० दिवसात हे काम पूर्ण करावयाचे आहे. कामाची रक्कम रु. ११.५५ लक्ष आहे. या आदेशाप्रमाणे राज्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोपवाटिकांचे बळकटीकरण या योजनेअंतर्गत वेगवेगळ्या सा. व. विभागात असलेल्या रोपवाटिकांचे मूल्यांकन करण्याबाबत प्रधान मुख्य संरक्षक, सामाजिक वनीकरण यांनी संचालक, चंद्रपूर प्रबोधिनी यांना नियुक्त केले होते. त्यांनी ते काम सेवक संघास दिले असून एकूण ७७ रोपवाटिकांचे गुणात्मक व दर्जात्मक मूल्यांकन करण्यात येणार आहे. संचालक, चंद्रमा यांचे प्र.मु. व. स. सा.व.वि.यांना जारी केलेल्या पत्रात परिच्छेद ३ मध्ये मूल्यांकन कामे सुरू करण्यात येत असल्याचे व आवश्यक सहकार्य सेवक संघास देण्याचे नमूद आहे. ४ मे रोजी या मूल्यांकन कामासाठी सामंजस्य करारावर स्वाक्ष-या करण्यात आल्या आहेत. हे कार्य जूनच्या पहिल्या आठवड्यापूर्वी **पूर्ण करणे आवश्यक आहे**.यासाठी श्री संजय जगताप यांची चमू प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली असून त्यांचेमार्फत दिनांक ९-५-२३ रोजी ऑनलाइन सभा घेण्यात आली. सभेत सविस्तर रणनीती आणि नियोजनावर चर्चा झाली. सर्वश्री. पत्की सर व चमू प्रमुख संजय जगताप यांचेकडून मार्गदर्शन करण्यात आले. बहुतांश सहभागी सभेला उपस्थित होते. मुल्यांकनाचे काम सुरू करण्यात आले आहे.

## 🌻 *नवी आव्हाने*

नाशिक जिल्ह्यातील नार-पार गिरणा पाटबंधारे प्रकल्पासाठी वन संवर्धन कायद्यांतर्गत मंजुरीसाठी प्रस्ताव तयार करण्याच्या कामासाठी सेवक संघ महाराष्ट्रशी श्री. श्रीकांत भट नागपूर यांचेकडून संपर्क साधण्यात आला आहे. प्रकल्पात समाविष्ट असलेली वन जमीन ९३९ हेक्टर आहे. खालील क्रियाकलापांचा समावेश आहे.

१. ८ लहान धरणे बांधणे.
२. बोगद्याचे बांधकाम.
३. रस्ते, पंप हाऊस, वसाहती, कार्यालये आणि इतर आवश्यक नागरी कामे बांधणे.

प्रस्तावित कामी दर पत्रक देण्याची तयारी सुरू आहे.


सेवकांच्या खालील सदस्यांना जोडीने प्रकल्पाचे क्षेत्रीय काम करण्यासाठी तात्पुरते, प्रस्तावित केले आहे,

१.श्री.एस.के.गवळी आणि
  श्री.आर.जे.राणे
२.श्री.पी.ए.सुतळे आणि
  श्री.एस.व्ही.कुंभकर्ण,
३.श्री.पी.के.कुलकर्णी आणि
  श्री. यू. एम. धोपेश्वरकर.

श्री. ए. आर. चड्डा, नोएडा येथील पीसीसीएफ (सेवानिवृत्त), यांनी प्रकल्पाचे चमू प्रमुख होण्याचे मान्य केले आहे. श्री बी. व्ही. सेलुकर, नागपूर येथील कार्यालयांमध्ये प्रकल्पाचा पाठपुरावा करण्याचे काम करतील. श्री. पत्की हे प्रकल्पाचे समन्वयक म्हणून काम पाहतील. श्री. ए. के. झा प्रमुवसं (सेवानिवृत्त) हे वनाधिकार विषयाचे सल्लागार म्हणून काम पाहणार आहेत. डॉ. एस. एच. पाटील प्रमुवसं (सेवानिवृत्त) यांचा देखील समावेश या चमूत आहे.

या विषयी दि.९५.२०२३ रोजी खालील अजेंड्यानुयार बैठक घेण्यात आली

१) दरपत्रकाचा तपशिल, रक्कम आणि खर्च ठरविणे
२) प्रकल्पाचे कामासाठी टीम तयार करणे आणि टीम सदस्यांचे बायोडाटा गोळा करणे.
३) धोरणात्मक नियोजन ठरवण्यासाठी चमू प्रमुखांचे मार्गदर्शन .
४)चमू प्रमुखांद्वारे सदस्यांना तात्पुरते कामाचे वाटप
५) कामाचे वेळापत्रक ठरविणे
६) प्रकल्पाच्या यंत्रणेसोबतच्या सामंजस्य कराराचा मसुदा निश्चिती व करार करणे,
७) प्रकल्पाच्या परिसरात आणि आजूबाजूला संरक्षित क्षेत्राची माहिती.
८) दरपत्रकासाठी सेवकच्या कार्यकारी समितीची मंजुरी घेणे.
९) प्रकल्पाच्या तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मान्यता.
१०) पाठपुरावा करण्यासाठी नाशिक/ नागपूर/मुंबई/ दिल्ली येथे संपर्क व्यक्तीच्या नियुक्त्या.
११) चमू प्रमुखांच्या परवानगीने मीटिंग दरम्यान उद्भवणारे इतर कोणतेही विषय.



### डॉ. श्री. विजयकुमार गावित, मंत्री, आदिवासी विकास यांना सामुहिक वन संसाधन हक्क व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे कामी दिले निवेदन





१२ मे २३ रोजी धुळे येथे मा. डॉ. श्री. विजयकुमार गावित, मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र यांना श्री.जयप्रकाश पाटील, सचिव, सेवक संघ, धुळे शाखा यांनी सेवक संघास नंदुरबार जिल्ह्यातील सर्व गावांचे सामुहिक वन संसाधन हक्क व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे काम देण्यात यावे असे निवेदन दिले. मंत्री महोदयांना तोरणमाळ गावचा नमुना आराखडा प्रत दिली व त्याकामी इतर विभागांचा सहभाग काय आहे ते विषद केले. नंदुरबार वन विभागात बनविलेल्या पाच आराखड्यांची वस्तुस्थिती अवगत केली. निवेदन पाहून मा. मंत्री महोदयांनी १५ दिवसांनी याकामी पुन्हा भेटण्यासाठी आमंत्रित केले आहे. श्री. पाटील हे त्यांचे वैयक्तिक संबंधांचा लाभ संघास मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत, ही आपल्यासाठी लाभकारक उपलब्धी आहे.


### नवीन आजीवन सदस्य

धुळे शाखेतील सर्व श्री. एन. एम. निकुमे, पी.एच. वाघ हे दोन सर्व साधारण सदस्य होते. सन २०२३-२४पासून ते आता आजीवन सदस्य झाले आहेत. त्यांचे अभिनंदन.

औरंगाबाद येथे राहत असलेले सर्वश्री. रमेश माणिकराव सोनटक्के, सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी, शंकर रूस्तुमराव खुपसे सेवानिवृत्त सहायक वन संरक्षक यांना धुळे शाखेत सर्वसाधारण सदस्य म्हणून स्विकृत केले आहे. औरंगाबाद कार्यकारिणीत कामे बंद असलेने त्यांना केंद्रीय समिती सचिवांच्या परवानगीने घेतले आहे. त्यांचे धुळे शाखेत सहर्ष स्वागत.

### श्री वसंत जोशी यांचे १४ वे पुस्तक प्रकाशित

आपण सर्वांना माहित आहे की संघाचे हितचिंतक, संस्थापक विश्वस्त, व दिर्घकाळ कार्यकारी मंडळाचे सदस्य असलेले श्री वसंत जोशी हे आज पुण्यामध्ये सेवा निवृत्त जीवन व्यतीत करत असले तरी, त्या आयुष्याचा उपयोग ते आध्यात्मिक, सामाजिक, धार्मिक कार्यासाठी करत आहेत. श्री वसंत जोशी यांचे चौदावे पुस्तक पुण्यात नुकतेच प्रकाशित झाले आहे. ते इंग्रजी भाषेत आहे. ही उपलब्धी निश्चितच सेवक संघास भूषणावह आहे. त्याबद्दल त्यांचे सेवक संघ परिवाराकडून विशेष अभिनंदन




#### ग्रंथ परिषण

अठराव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेलेले विदर्भातील नावाजलेले एक जन्मांध संत श्री गुलाबराव महाराज यांचे शिष्य व उत्तराधिकारी वेदांतकेसरी श्री बाबाजी महाराज पंडीत यांनी लिहिलेल्या 'आर्य-धर्म-उपपत्ती' ह्या एका अभ्यासपूर्ण पुस्तकाचे 'Aryan Religion Genesis' हे श्री वसंत जोशी यांनी केलेले इंग्लिश भाषांतर आहे. ह्या ग्रंथात जे मुद्दे प्रामुख्याने मांडले आहेत ते असे की आर्य धर्म हा भारतातील (आर्यावर्तातील) एक सनातन असा धर्म आहे. तो धर्म मानव निर्मित नसून तो प्रत्यक्ष भगवानाने निमार्ण केलेला आहे. मानव हा सृष्टीच्या आरंभी रानटी अवस्थेत होता व काळाच्या ओघा बरोबर तो सुधारत गेला हे पाश्च्यात मत चुकीचे असून मानव सत्य युगापासून अत्यंत प्रगत अवस्थेत होता, ज्या युगात भारतात अनेक महान ऋषी मुनी होऊन गेले व त्यांनी वेद, पुराणे, उपनिषदे, दर्शने असे अनेक महान ग्रंथ निर्माण केले. त्यानंतर मानवात अनेक दुष्ट प्रवृती निर्माण होऊन तो सध्याच्या कलीयुगा पर्यंत येऊन पोहोचला आहे. आर्य हे उत्तर ध्रुवा वरून भारतात आले हे पाश्च्यात मतही चुकीचे असून आर्य हे भारतातच पैदा झाले असून ते कालांतराने जगभर पसरले गेले. आर्य संस्कृती ही मनाच्या सतगुण विकासावर आधारीत असून केवळ भौतिक विकासाने मानव विनाशक शस्त्रे निर्माण करून मानवजात नष्ट करण्याच्या मार्गावर जात आहे. ईश्वर भक्ती ही केवळ विज्ञान ज्ञाना पेक्षा श्रेष्ठ व आत्मिक प्रगती करणारी आहे इत्यादी मुद्यांचा ह्या पुस्तकात परामर्श घेतला गेला आहे.

### निधन वार्ता

सेवक संघाचे मुख्य आधारस्तंभ, मार्गदर्शक, श्री. व्ही. टी. पत्की सर यांच्या पत्नी, सौ. वैशाली विठ्ठल पत्की (जन्म २१-११-१९४५) यांचे दि.२५-०४-२०२३ रोजी, १०.५५ वा.दुःखद निधन झाले. त्यांचे मागे, पती, दोन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ईश्वर त्यांचे आत्म्यास सदगती देवो. सेवक संघातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली

*श्री अरुण वसंत म्हात्रे सेवानिवृत्त वनक्षेत्रपाल एफ डी सी एम लि.यांचे दिनांक १५.०५.२०२३ रोजी रात्री १.०० वाजता दु:खद निधन झाले. त्यांची अंत्यविधी अंबाडी झाला.ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच प्रार्थना! सेवकतर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी